# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

१० डिसेंबर २०२३ रविवार

## चोरी

**पोलीस स्टेशन सावनेर** :—अंतर्गत पिपळा किनखेडा १० केमी दक्षिण, येथे यातील अज्ञात आरोपीने स्वताचे आर्थिक फायद्‌यासाठी १०० केव्हीए क्षमतेची टेकाडे डीपी नावाची जिचा डीटीसीक्र ४३५४१०१ असलेली डीपी फोडुन त्यातील **अल्सुमिनीयमचे कॉईलकिअंदाजे ७०,०००/— रू चे दिनांक ०६/१२/२३ चे १४/०० ते ०७/१२/२३ चे १६/०० वा दरम्यान चोरून नेले**.

सदर प्रकरणी फिर्यादीनामे—दिनेश बालकदार वासनिक वय ४९ वर्ष रा मोहपा ता सावनेर यांचे रिपोर्टवरून अज्ञात आरोपीविरूध्द पोस्टे सावनेर येथे कलम ३७९ भादवि अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास एएसआय /यादव मो न ८८८८२१३९३हे करीत आहे.

## फुस लावुन पळवुन नेणे

**पोलीस स्टेशन अरोली**:—अंतर्गत मौजा आसोली ०४ किमी पश्चिम. येथे यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १६ वर्ष रा. आसोली ही दिनांक ०६/१२/२३ चे ०९/०० वा दरम्यान, कॉलेजला जाते असे म्हणुन घरून निघुन गेली. परंतु सायंकाळी ०६/०० वा. सुदधा घरी परत आली नाही. यावरून फिर्यादी हिने आपल्या भाचीला फोन लावला असता तिने सांगितले की, “रामसिंग यादव याने पिडीतेस पळवून नेले आह”, फिर्यादीने आपल्या मुलीच्या व रामसिंग यादव याचे फोनवर कॉल केला असता फोन बंद दाखवित आहे. **यातील आरोपी नामे रामसिंग यादव याने फिर्यादीचे मुलीला फुस लावुन, तिचा अज्ञानपणाचा फायदा घेवून तिला पळवून नेले.**

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपी नामे—रामसिंग यादव याचे विरूध्द कलम ३६३ भा.द.वि.अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो. हवा. दत्ताबगमारे पो. स्टे. अरोली मो. क्र. ७०३०१०९९६४ हे करीत आहे.

## घरफोडी

**पोलीस स्टेशन उमरेड** :–अंतर्गत मौजा कावरापेठ उमरेड ०२ किमी पश्चिम, येथे फिर्यादीचे घरी कोणीही हजर नसतांना यातील अज्ञात आरोपीने फिर्यादीचे दाराचे कुलुप उघडुन आतमध्ये ठेवलेले दागिने १)सोन्याचा गोप १२ ग्रॅाम अंदाजे कि ४८०००/–रू, २)सोन्याचा लहान गोप ५ ग्रॅाम अंदाजे २००००/–रू, ३)सोन्याची चपलाकंठी २५ ग्रॅाम अंदाजे कि १०००००/– ४)सोन्याचे कानातने दोन टाप्स ४ ग्रॅाम अंदाजे कि १६०००/–रू ५)सोन्याचे कानातल्या दोन कुडया १ ग्रॅाम अंदाजे कि ४०००/–रू ६)एक सोन्याची नथ २ ग्रॅाम अंदाजे कि ८०००/–रू ७)सोन्याचे डोरल २ ग्रॅाम अंदाजे कि ८०००/– ८)सोन्याचे पीटी व १५ मनी दोन ग्रॅाम अंदाजे कि ८०००/–रू ९)सोन्याची अंगठी ४ ग्रॅम अंदाजे कि १६०००/–रू असे **एकुण ५७ ग्रॅाम सोन्याचे दागीने एकुण कि अंदाजे २,२८,०००/–रू चा माल कोणीतरी अज्ञात चोराने दिनांक ०९/१२/२०२३ रोजी चे सकाळी १०/१५ ते १०/४५ वा दरम्यान चोरून नेले आहे.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे–राजेंद्र मानीकराव रोहणकर वय ५७ वर्ष रा कावरापेठ मा उमरेड पारषिवनी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ४५४, ३८० भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील पोउपनि/दिनेश खोटेले पो स्टे उमरेड मोक्र ९४०४०८०६६६ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पोलीस स्टेशन बेला**:–अंतर्गत सिर्सी त उमरेड जाणारा डांबरी रोड २२ किमी पुर्व, येथे दिनांक०८/१२/२३ चे १९/३० वा दरम्यान, यातील फिर्यादी हा ढाब्यावर काम करीत असुन तेथील ढाबा मालकाचा चुलत भाउ नामे–विजय अमृत राउत वय ६० वष हा ढाब्यावर जेवण करून बाथरूम करण्यासाठी रोडच्या बाजुला थांबुन असतांना, सिर्सीकडुन येणाऱ्या अज्ञात वाहनचालकाने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन रोडच्याविरूध्द बाजुला जावुन सदर विजय अमृत राउत वय ६० वर्ष याला जखमी केले. उपचारासाठी ग्रामीण रूग्णालय उमरेड येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी तपासुन जखमी याला मृत घोषीतकेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे–मारोती रघुनाथ सुरपाम वय ५० वर्षरा खैरगाव त केळापुर जि यवतमाळ ह मु महालगाव त भिवापुर जि नागपुर यांचे रिपोर्टवरुन पोस्टे बेला येथे बुलेरो पिकअप गाडी क्र एमएच २७ बीएक्स ५९८० चा चालकाविरूध्द पोस्टे बेला येथे कलम २७९, ३०४(अ) भादवी सह कलम १८४, १३४ मोवाका अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि खंडेराव बोळगीर पोस्टे बेला मोन ९७६५७७१९७७ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यु

**पोलीस स्टेशन कोंढाळी**:—अंतर्गत कोंढाळी टाउन ०१ पश्चिम,येथे मृतक नामे—रूपेश चिरकुराव फरकाडे वय ३५ वर्ष रा वार्ड क्र १ पि एच सी रोड कोंढाळी ता काटोल यांनी दारूच्या नशेत दिनांक ०८/१२/२३ चे १७/३० वा ते ०९/१२/२३ चे ०७/३० वा दरम्यान, स्वताच्या घराचे दार बंद करून घरामधील स्वयंपाक खोलीतील स्लॅपच्या हुकाला कापडयाच्या दोरीच्या सहयाने गळफास लावून आत्महत्या केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे—निलेश चिरकुराव फरकाडे वय ३७ वर्ष रा कोंढाळी ता काटोल यांचे रिपोर्टवरुन पोस्टे कोंढाळी येथे कलम १७४ जाफौ अन्वयें मग दाखल करण्यातआला. सदर मर्गचा पुढील तपास पोहवा/रेवतकर पोस्टे कोढाळी हे करीत आहे.

**पोलीसउपनिरीक्षकभारतथिटे**
**मोक्र९४२२६१४६३३**
**पोलीसमाहीती कक्ष**
**नागपूरजिल्हा (ग्रामीण),नागपुर**